मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | मंगळवार, दि. 30 सप्टेंबर 2025 | पान- 1

# नदीचे पात्र कमी केल्यामुळेच पूर परिस्थिती

## पवना, मुळा, इंद्रायणीसह राज्यातील सर्व नद्यांची हीच परिस्थिती; उपमुख्यमंत्री अजित पवार



**पिंपरी | प्रतिनीधी**

पवना, मुळा, इंद्रायणीसह राज्यातील सर्व नद्यांचे पात्र कमी केल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील अनेक नद्यांना पूर आला आहे.प्रचंड नुकसान झाले असून यातून आता ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे नदी सुधार प्रकल्प राबवताना नदीवरील पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्या, नदी स्वच्छता, जलप्रवाहातील अडथळे दूर करण्यासह पूरस्थिती नियंत्रणाच्या दृष्टिने उपाययोजना राबवाव्यात, सर्व विभागांनी यापूर्वीसारखेच समन्वय ठेवून काम करावेत असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.

पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील मुळा, मुठा, पवना आणि इंद्रायणी नदीवर राबवण्यात येणाऱ्या नदी सुधार प्रकल्पांबाबत आज उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेसह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), जलसंपदा विभाग, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र (सीडब्ल्यूपीआरएस) अशा नदी सुधार प्रकल्पासंबंधित सर्व शासकीय यंत्रणांची संयुक्त बैठक आज पिंपरी चिंचवड महापालिका मुख्य इमारतीतील कै. मधुकर पवळे सभागृह येथे पार पडली. यावेळी ते बोलत होते.

बैठकीला राज्याच्या विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्यासह पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम,पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, पीएमआरडीए अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पुणे महापालिका अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पुणे महापालिका आणि पिंपरी चिंचवड महापालिका नदी सुधार प्रकल्प समन्वयाने राबवत आहेत. या अनुषंगाने महापालिकांनी पावसाळ्यात उद्भवणारी परिस्थिती पाहून योग्य निर्णय घ्यावे असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले ते पुढे म्हणाले, पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीसह अनेक नद्यांचे पात्र कमी केले जात आहे. यामुळे पुरजन्य परिस्थिती निर्माण होते. म्हणूनच पर्यावरण वाद्यांचा या नदी सुधार प्रकल्पांना विरोध आहे. मुळा आणि मुठा नदीच्या सुधारण्यासाठी पुण्याच्या बाजूचा ठेकेदार आणि पिंपरीच्या बाजूचा ठेकेदार वेगळा आहे. यामुळे समन्वयाचा अभाव आहे. याकडे महापालिकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. आत्ता राज्यातील अनेक नद्यांना पूर आला, प्रचंड नुकसान झालं. ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न निर्माण झाला आहे. परतीच्या पावसाचे संकटही राज्यासमोर आहे त्यामुळे यातून योग्य तोडगा काढणे गरजेचे आहे.

### ओला दुष्काळ जाहीर करणार का?

» मुख्यमंत्री आणि सरकार म्हणून आम्ही सांगितलं आहे. शेतकऱ्यांना असं काही द्यावं लागणार आहे, जेणेकरून सरकार त्यांच्या पाठीशी आहे, असं वाटायला हवं. दिवाळीपर्यंत बळीराजाला या संकटातून बाहेर काढण्याचे नियोजन आहे.आत्ता तातडीची 5000 रुपये, अन्न-धान्य, कपडे, निवारा अशी मदत केली जातीये. कॅबिनेट बैठकीमध्ये ओला दुष्काळ जाहीर करायचा का यावर नक्कीच चर्चा होईल.

### पाऊस थांबल्यानंतर चाकणमधील रस्त्यांचे डांबरीकरण

» पाऊस थांबल्यावर डांबरीकरणाचे काम सुरू होईल. तूर्तास चाकण परिसरातील अतिक्रमण हटवले जातायेत. आपल्याला जे साध्य करायचं आहे, ते पाऊस थांबल्यावर करता येईल. चालू पावसात जी कामं करता येतील तेवढी सध्या कामं करतोय.

# शिवसेनेतर्फे डॉक्टर व वैद्यकीय सेवकांचा 'जीवन रक्षक' पुरस्काराने गौरव

## डॉक्टर व वैद्यकीय सेवकांचा मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव

**पिंपरी | प्रतिनीधी**

शिवसेना आणि कामशेत ग्रामपंचायतीच्या उपसरपंच अंजनाताई डॉ. विकेश मुथ्था यांच्या वतीने वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या डॉक्टर व वैद्यकीय सेवकांचा मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते 'जीवन रक्षक' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. चोवीस तास रुग्णांची सेवा करणाऱ्या डॉक्टर, वैद्यकीय क्षेत्रातील परिचारिका, वॉर्ड बॉय, आया, मावशीच्या कामाचे खासदार बारणे यांनी कौतुक केले.

यावेळी डॉ. सत्यजित वाढावकर, डॉ. श्रीकृष्ण जोशी, लोकमान्य रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उमाकांत गलांडे, शिवसेना जिल्हाप्रमुख राजाभाऊ खांडभोर, शिवसेना जिल्हा संघटिका शिलाताई भोंडवे, मावळ लोकसभा युवासेना अध्यक्ष विशाल हुलावळे, सोशल मीडिया जिल्हा प्रमुख सुदर्शन देसले, शिवसेना उपजिल्हा प्रमुख दिलीप पांढरकर, शिवसेना मावळ तालुका प्रमुख राम सावंत, युवासेना मावळ तालुका प्रमुख राजेश वाघोले, नवनाथ हरपुडे, कामशेत शिवसेना शहर प्रमुख सतीश इंगवले उपस्थित होते.



पिंपरी-चिंचवड शहरातील नामांकित डॉक्टर भूलतज्ज्ञ डॉ.नरेश चव्हाण, सर्जन डॉ.आदित्य यादव, मेंदू व मनका तज्ञ डॉ.मोहनीस दिघे, जनरल सर्जन डॉ.तोशित लोन, जनरल सर्जन डॉ.नितेश जैस्वाल, न्युरो सर्जन डॉ.सुनील वाघवे,भूल तज्ञ डॉ.बिना जैन, अस्थिरोग तज्ञ डॉ.अभिजित मोरे, फिजिशियन डॉ.शैलेश अडवाणी, जपनोस्टिक किरण किल्लावाला, रक्तपेटी प्रवीण नवले यांचा गौरव करण्यात आला. रुग्णवाहिका सेवेबाबत विकास वायकर, राजेश भालेराव, पिंटू मानकर, राजेश भालेराव यांनाही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, डॉक्टर वैद्यकीय क्षेत्रात चांगले काम करतात. त्यांच्या कामांची दखल घेतली जात नाही. डॉक्टर मानव जातीची सेवा करतात. रुग्ण आल्यानंतर रात्री-अपरात्री रुग्णालयात जावे लागते. कोरोना कालावधी डॉक्टरांनी जीवाची बाजू लावून रुग्णांची सेवा केली. रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टरांचे शिवसेनेतर्फे कौतुक करण्यात आले. याचा आनंद होत आहे. काही जणांमुळे वैद्यकीय क्षेत्राला गालबोट लागले जाते. या क्षेत्रातील जेष्ठांनी पुढाकार घेऊन ते टाळावे, असे आवाहनही खासदार बारणे यांनी केले आहे.

# निळ्या पूररेषेत 1,686 अनधिकृत बांधकामे!

## खरेदी-विक्रीचे व्यवहार करू नका; पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीपात्राच्या निळ्या पूररेषेत एक हजार ६८६ अनधिकृत बांधकामे आढळली आहेत. त्यामध्ये दुकाने, घरे, पत्राशेड, आरसीसी बांधकामे, कच्च्या विटांची घरे, तसेच भंगार दुकानांचा समावेश आहे.

या बांधकामांची यादी महापालिकेने दुय्यम निबंधक कार्यालयाला सादर केली आहे. अनधिकृत बांधकामांबाबत कोणतेही खरेदी-विक्री व्यवहार करू नयेत, असे आवाहन महापालिकेने केले आहे.




शहरातून पवना नदी २४.४ किलोमीटर, इंद्रायणी २०.६, तर मुळा नदी १२.४ किलोमीटर अंतर वाहते. या नद्यांच्या काठी पूररेषेत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली आहेत. चिखलीत इंद्रायणी नदीच्या काठी उभारलेल्या आलिशान बंगल्यांवर महापालिकेने कारवाई केली. त्यानंतर तिन्ही नद्यांच्या पूररेषेत येणाऱ्या अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण महापालिकेने केले. आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्फे सखोल पाहणी करण्यात आली. त्यामध्ये एक हजार ६८६ अनधिकृत बांधकामे आढळून आली आहेत. नदीपात्रातील निळ्या पूररेषेत येणारी ही बांधकामे पूरप्रवण क्षेत्रात असल्यामुळे येथील अनधिकृत बांधकामांबाबत कोणतेही खरेदी-विक्री व्यवहार अथवा नोंदणी होऊ नयेत. तसेच, सामान्य नागरिकांची फसवणूक टळावी, यासाठी बाधित बांधकामांची यादी तयार करण्यात आली. ती यादी दुय्यम निबंधक कार्यालयाला सादर केली आहे. तसेच, प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामार्फत संबंधित अनधिकृत बांधकामांवर नोटीस चिकटविण्यात आली असल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले.

### ‘ड’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत सर्वाधिक बांधकामे

» महापालिकेच्या ‘ड’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील वाकड गावठाण, पिंपळे सौदागर, रहाटणी, पिंपळे निलख भागांत सर्वाधिक ३९१ बांधकामे निळ्या पूररेषेत आहेत. त्या खालोखाल ‘क’मध्ये रिव्हर रेसिडेन्सी, जाधववाडी, मोईफाटा, कुदळवाडीत ३३१, ‘ब’मध्ये वाल्हेकरवाडी, भोंडवे कॉर्नर, रावेत, केशवनगर, कासारवाडी परिसरात ३१२, ‘ग’मध्ये पिंपरीगाव, सुभाषनगर, संजय गांधी नगर १७५, ‘अ’ मधील भाटनगर, पिंपरी स्टेशन, पिंपरी मुख्य बाजारपेठ १६८, ‘ह’ मधील सांगवी, दापोडी १६४, ‘फ’ मधील डिफेन्स कॉलनी, बग वस्ती, पाटीलनगर ८६ आणि ‘ई’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मोशी टोलनाका, दाभाडे वस्ती, डुडूळगाव गावठाण परिसरात ५९ बांधकामे निळ्या पूररेषेत आहेत.

> “ शहरातून वाहणाऱ्या नदीपात्रातील निळ्या पूररेषेत एक हजार ६८६ अनधिकृत बांधकामे आढळली आहेत. या बांधकामांवर नोटीस चिकटविण्यात आली आहे. नागरिकांनी या अनधिकृत बांधकामांपासून दूर राहावे. कोणतेही आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी आवश्यक ती शासकीय पडताळणी करावी.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

---

# मराठवाडासह राज्यातील महापूरग्रस्तांसाठी “एक हात मदतीचा”

## आमदार महेश लांडगे यांची यंत्रणा लागली कामाला; सरचिटणीस विकास डोळस यांचे मदतकार्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाने झोडपले आहे. मराठवाडा, विदर्भ, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागात अक्षरश: ओला दुष्काळ पडला आहे. अनेक संसार उद्धस्त झाले असून, शेतकरी हतबल झाला आहे. अशा परिस्थितीमध्ये वाढदिवस किंवा सभा-समारंभांवर अनावश्यक खर्च न करता आपत्ती ग्रस्तांसाठी ‘एक हात मदतीचा’ देण्याचा संकल्प करण्यात आला आहे, अशी माहिती भाजपा सरचिटणीस विकास डोळस यांनी दिली.

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली ‘एक हात मदतीचा’ उपक्रम सुरू केला आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना,




नांदेड, परभणी, बीड, लातूर, हिंगोली या जिल्ह्यात शेती आणि शेतकरी यांचे मोठे नुकसान झाले. राज्यातील भाजपा महायुती सरकार सर्वोतोपरी मदतकार्य करीत आहे. पण, महापूरात संकटगस्त असलेल्या शेतकरी-कष्टकरी यांचा दसरा-दिवाळीवर ‘संक्रांत’ ओढावली आहे. शेवटच्या घटकाचीसुद्धा दिवाळी गोड झाली पाहिजे. यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला असून, शहरवासीयांना मदत उभा करण्याचे आवाहन केले आहे.

सांगली-सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील महापूर आणि कोकणातील चक्रीवादळाच्या काळात आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडमधून मोठ्या प्रमाणात मदतकार्य केले होते. आता मराठवाडा आणि पूरग्रस्त भागात लोकसहभाग आणि वैयक्तीक अशी मदत करण्याचा संकल्प आमदार लांडगे आणि सहकाऱ्यांनी केला आहे.

विकास डोळस म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमधील मराठवाडास्थित स्वयंसेवी संस्था, संघटना आणि दानशूर व्यक्तींनी मराठवाडासह अन्य भागातील आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासाठी श्री. सुहास ताम्हाणे : 8087596196 यांच्याशी संपर्क करावा. तसेच, औद्योगिक व व्यापार क्षेत्रातील दानशूर व्यक्तींनी श्री. शुभम मानमोडे : 84467 52571 यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन केले आहे.

विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवडमध्ये वास्तव्य करणारे मराठवाड्यातील नागरिकांना आपल्या नातेवाईकांना मदत करायची असेल. त्यांनी श्री. अनिकेत गायकवाड : 89758 96999 आणि श्री. संदीप ठाणेकर : 97656 49797 यांना संपर्क करावा.

### .... अशी करता येईल मदत!

» पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी मराठवाडा व इतर पुरग्रस्त भागात झालेल्या भीषण पूरस्थितीमुळे शेकडो कुटुंबाचे संसार उद्धस्त झाले आहे. जनजीवन विस्कळीत झाले आहे. तेथील पूरग्रस्थ पीडितांना आपण मदत करु शकता. तांदुळ, पीठ, तुरडाळ, तेल पॅकेट, मीठ-मिर्ची पावडर, हळद पावडर, पाणी जार, बिस्किट आणि ब्लँकेट व कपडे अशा स्वरुपात मदत करता येईल. एका कुटुंबाला किमान एक महिन्यांची भोजन व्यवस्था होईल, असे पॅकेट १ हजार रुपयांपर्यंत तयार करण्यात येईल. अशा स्वरुपात मदत करण्यासाठी श्री. संजय पटनी यांच्यासोबत 9822217163 संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. भोसरी येथील महेशदादा स्पोर्ट्स फॉउंडेशन मैदान येथे प्रत्यक्ष मदत स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

# साथरोग नियंत्रणासाठी महापालिकेचे प्रभावी पाऊल

## जनजागृती, वैज्ञानिक विश्लेषण आणि समन्वयात्मक प्रतिबंधात्मक यंत्रणा उभारण्याच्या उद्देशाने सर्वेक्षण केंद्र सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत पुण्यात विविध साथरोगांचा उद्रेक झाल्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने महानगरीय सर्वेक्षण केंद्र (मेट्रोपोलिटन सर्व्हिलन्स युनिट) कार्यान्वित केले आहे. या केंद्राच्या माध्यमातून संसर्गजन्य आजारांवर वेळेत लक्ष ठेवता येणार असून, रोगांचा प्रसार रोखण्यासाठी त्वरित प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत नियोजन करता येणार आहे.



शहरात यापूर्वी २००९ मध्ये स्वाईन फ्लू, २०२० मध्ये कोरोना आणि नुकतेच २०२५ मध्ये जीबीएससारखे संसर्गजन्य आजार मोठ्या प्रमाणात पसरले होते. बदलते पर्यावरण व हवामान, दूषित अन्न व पाणी, तसेच शहरी जीवनशैलीमुळे साथरोग उद्रेकांची शक्यता वाढत आहे. या पार्श्वभूमीवर जनजागृती, वैज्ञानिक विश्लेषण आणि समन्वयात्मक प्रतिबंधात्मक यंत्रणा उभारण्याच्या उद्देशाने सर्वेक्षण केंद्र सुरू करण्यात आले.

या केंद्रासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांची समन्वय बैठक घेण्यात आली. यात विमानतळ प्राधिकरण, भारतीय हवामान विभाग, सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, रेल्वे, राज्य अन्न व औषध प्रशासन, एनआयव्ही, डब्ल्यूएचओ राज्य किटकजन्य आजार नियंत्रण विभाग, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, वैद्यकीय महाविद्यालये, तसेच मनपाच्या पाणीपुरवठा, मलनिस्सारण, आरोग्य आदी विभागांतील प्रतिनिधी उपस्थित होते.

> “महानगरीय सर्वेक्षण केंद्र शहराच्या आरोग्य व्यवस्थेसाठी ऐतिहासिक पाऊल आहे. वेळेवर माहिती संकलन, रोगांचे विश्लेषण आणि त्यावर आधारित उपाययोजना त्वरित करता येतील. नागरिकांच्या आरोग्य रक्षणासाठी ही प्रभावी यंत्रणा ठरेल.
> **- नवल किशोर राम,**
> **आयुक्त महापालिका.**

या केंद्राच्या कार्यपद्धतीबाबत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सी.एम.जे. प्रदीप चंद्रन यांनी सांगितले की, विविध विभागांकडून मिळणारी माहिती एकत्रित करून रोगांचे वैज्ञानिक विश्लेषण केले जाईल. त्यामुळे संभाव्य साथरोगांचा अंदाज बांधणे, त्यावर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना आखणे आणि नागरिकांना सुरक्षित ठेवणे अधिक सुलभ होईल. केंद्रीय अधिकारी डॉ. शुभांगी कळसुंगे (एनसीडीसी) यांनी अल्पावधीत कार्यान्वित एमएसयूबद्दल पुण्याचे अभिनंदन केले. तर जागतिक बँकेचे तांत्रिक सल्लागार डॉ. प्रदीप आवटे यांनी वन हेल्थ संकल्पनेअंतर्गत आंतरविभागीय समन्वयाची गरज अधोरेखित केली. महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोराडे यांनी एमएसयूमुळे आरोग्य सेवांना वैज्ञानिक व तांत्रिक बळकटी मिळणार असल्याचे नमूद केले. आयुक्तांनी योगदान दिलेल्या सर्व विभागांचे कौतुक करताना एमएसयू युनिट देशातील सर्वोत्तम व अत्याधुनिक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# बैलाला साखळी घालतात तसे दिसते

## अजित पवार ज्वेलरी शॉपच्या उद्घाटनाला गेले, गोल्डमॅन म्हणून वावरणाऱ्यांना फटकारले

**पुणे | प्रतिनिधी**

सोन्याचे दागिने घालणं हे स्त्रियांनाच शोभून दिसते. पुरुषांनी उगीच त्या भानगडीत पडू नये. अन्यथा गळ्यात सोन्याच्या जाडजूड साखळ्या घालणारे पुरुष गळ्यात साखळी घातलेल्या बैलांसारखे दिसतात, असे वक्तव्य अजित पवार यांनी केले. ते सोमवारी चाकण येथील रांका ज्वेलर्सच्या दालनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी त्यांनी गोल्डनमॅन म्हणून मिरवणाऱ्या आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना कानपिचक्या दिल्या.



**काय म्हणाले अजित पवार?**

लहानातल्या लहान माणसांपासून अनेक लोकांना सोनं आणि सोन्याचे दागिने वापरणं आवडतं. एकंदरीतच लोकांचं राहणीमान बदलतं आहे. पर्चेसिंग पावर वाढली आहे. त्यामुळे अनेकजण सोन्याच्या ज्वेलर्समध्ये जाऊन चांगलं सोनं खरेदी करतात. एखादा प्रसंग आलाच तर सोनं गहाणही ठेवता येतं. वेळेला त्याचे पैसेही करता येतात. आपल्याकडे गोल्डन मॅन म्हणूनही काहींची ओळख आहे. कुणीतरी तर सोन्याचे कपडेही शिवले होते हे आपण पाहिलं. पण ते सगळं अति होतं. मला या सगळ्यांना सांगायचं आहे की सोनं हे आपल्या आईच्या, पत्नीच्या, लाडक्या बहिणीच्या किंवा मुलीच्या अंगावर शोभून दिसतं. पुरुषांच्या अंगावर एवढं सोनं काही शोभून दिसत नाही त्यामुळे उगीचच त्या भानगडीत पडू नका. आपण त्या बैलाला साखळी घालतो तशा साखळ्या घालतात आणि येतात समोर. जे कुणी अशा साखळ्या घालतात ते त्यांच्या पैशांनी घालतात. मला काही त्यांच्याबाबत बोलण्याचा अधिकार नाही पण ते सोनं त्यांनी त्यांच्या घरातल्या स्त्रियांना दिलं तर जास्त चांगलं होईल.

**अजित पवारांकडून पूरग्रस्तांच्या मदतीविषयी भाष्य, म्हणाले...**

सर्व मंत्र्यांनी दौरे केलेत. शेतकऱ्यांचा रोष, नाराजी, राग, विरोध पाहायला मिळाला. जेव्हा घरदार उध्वस्त होतं, शेतीचं प्रचंड नुकसान होतं, जमीन वाहून जाते, तेव्हा साहजिक अशा प्रतिक्रिया उमटतात. पण आम्ही या शेतकऱ्यांना कशी मदत करता येईल, त्या अनुषंगाने निर्णय घ्यायचं ठरवलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीचा दौरा केला. पंतप्रधान नरेंद्र मोदींना झालेल्या नुकसानीची माहिती दिली आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळावी अशी मागणी केलेली आहे. यासाठी विविध विभागांची मदत लागणार आहे. सरकार याबाबत उद्याच्या बैठकीत निर्णय घेईल, असे अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

मुख्यमंत्री आणि सरकार म्हणून आम्ही सांगितलं आहे. शेतकऱ्यांना असं काही द्यावं लागणार आहे, जेणेकरून सरकार त्यांच्या पाठीशी आहे, असं वाटायला हवं. दिवाळीपर्यंत बळीराजाला या संकटातून बाहेर काढण्याचे नियोजन आहे. आत्ता तातडीची ५ हजार रुपये, अन्न-धान्य, कपडे, निवारा अशी मदत केली जात आहे, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

# इंदूरप्रमाणे बारामती, चाकण, लोणावळा स्वच्छ करणार

## बारामती सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीला इंदूरच्या धर्तीवर विकसित केले जाणार असून चाकण, बारामती आणि लोणावळा ही तीन शहरे इंदूरच्या धर्तीवर स्वच्छ करणार आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

बारामती सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. ते म्हणाले, राज्याच्या अनेक भागात अजूनही अतिवृष्टी होत आहे. रेड अलर्ट राहण्याची शक्यता आहे. अतिवृष्टीने मोठे नुकसान झाले आहे. नांदेडमध्ये पावसाने सर्व काही उद्धवस्त केले आहे.



मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यांसह सोलापूरमध्येही पावसाने कहर केला आहे. निसर्गाची अवकृपा झाल्यावर काय होते, ते आपण पाहिले आहे. त्यामुळे मदतकार्य तातडीने सुरू आहे. पाच ट्रक साड्या-परकर आणि आवश्यक साहित्य पाठवण्याचं नियोजन केलं आहे.

यासह, मी सकाळी सहाला कामाला सुरुवात करतो. काल-परवा तर जेवायलाही वेळ मिळाला नाही. कामाच्या बाबतीत माझा हात कुणी धरू शकत नाही. मी कामाचा माणूस आहे, असेही पवार या वेळी म्हणाले.

**विकासकामांसाठी कोट्यवधींचा निधी**

बारामती शहरात शारदा प्रांगणात अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांसाठी इंग्राजी सीबीएसई शाळा सुरू केली जाणार आहे. त्यासाठी 17 कोटी 50 लाखांचा निधी दिला आहे. उर्दू शाळा इमारतीसाठी सात कोटींचा निधी देण्यात आला आहे. गरिबांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे हा आमचा हेतू आहे.

तिरंगा सर्कल ते पेन्सिल चौक या दरम्यानच्या राहिलेल्या कामासाठी अतिरिक्त पाच कोटी रुपये दिले आहे.सिल्व्हर ज्युबिलीशेजारी महावितरणची जुनी इमारत काढून तेथे नवीन इमारत बांधली जाणार आहे. जळोची अग्निशमन केंद्रासाठी दोन कोटींचा निधी दिला आहे. विविध कामांसाठी 25 कोटी मंजूर करण्यात आले आहेत. एमआयडीसी परिसरात 78 कोटींचे स्टेडियम मंजूर करण्यात आले आहे.

### ही तर दोडकी बहीण

» बारामतीत पावसाचे पाणी जाण्यासाठी काही ठिकाणी जाळ्या बसवल्या आहेत. त्यातून पाणी जाण्यासाठी वेळ लागतो. परंतु काही जण लगेच त्याचे व्हिडिओ काढून बारामती तुंबल्याचे दाखवतात. काही लोक आमच्या लाडक्या बहिणींना गाडी घेऊन तेथे उभे करून व्हिडिओ काढतात. असे व्हिडिओ काढणाऱ्यांनो, जरा लाजा वाटू द्या, आम्ही आमची बहीण लाडकी... लाडकी म्हणतो पण तीसुद्धा दोडकीसारखी वागतेय, असे पवार म्हणाले.

### माझ्या विचारांचेच लोक निवडून द्या

» मी कामाचा माणूस आहे, बिनकामाचा नाही. पुढे निवडणुका आहेत. काही जण फिरायला लागले आहेत, इकडे लक्ष दिले का त्यांनी ? जर विकास थांबवायचा नसेल, तर माझ्या विचारांचे लोक निवडून द्यावे लागतील, असे आवाहनही पवार यांनी या वेळी केले.

# वैष्णवी हगवणे प्रकरणात सासू, नणंदेसह तिघांचा जामीन फेटाळला

## हुंडाबळी हा समाजाला लागलेला मोठा कलंक आहे, न्यायालयाचे निरीक्षण

**पुणे | प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात आरोपी सासू, नणंद आणि पतीच्या मित्राचा जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. पी. क्षीरसार यांनी फेटाळून लावला. 'हुंडाबळी हा समाजाला लागलेला मोठा कलंक आहे', असे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने तिघांचे जामीन अर्ज फेटाळून लावले.



मुळशीतील तालुक्यातील भूगाव परिसरात वैष्णवी शशांक हगवणे (वय २४) हिने राहत्य घरात गळफास घेऊन १६ मे रोजी आत्महत्या केली होती. वैष्णवीचा हुंड्यासाठी छळ केल्याने तिने आत्महत्येचे पाऊल उचलले होते. या प्रकरणी वैष्णवीची सासू लता राजेंद्र हगवणे (वय ५४), नणंद करिश्मा (वय २१, दोघी रा. भुकूम, मुळशी), पती शशांक (वय २७) दीर, सासरे,राजेंद्र, तसेच पतीचा मित्र नीलेश रामचंद्र चव्हाण (वय ३५, रा. कर्वेनगर) यांना अटक करण्यात आली होती.

वैष्णवीच्या बाळाचा बेकायदा ताबा नीलेश चव्हाण याने घेतला होता. वैष्णवीचे काका आणि नातेवाईक नीलेश चव्हाणच्या घरी गेले होते. तेव्हा नीलेशने कस्पटे कुटुंबीयांना पिस्तुलाचा धाक दाखविला होता. या प्रकरणी सासू लता, नणंद करिश्मा, मित्र नीलेश यांनी वकील ॲड. विपुल दुशिंग यांच्या मार्फत अतिरिक्त सत्र न्यायाधीश के.पी. क्षीरसागर यांच्या न्यायालयात जामीन मिळवण्यासाठी अर्ज केला होता. विशेष सरकारी वकील उज्ज्वला पवार आणि कस्पटे कुटुंबीयांचे वकील ॲड. शिवम निंबाळकर यांनी आरोपीच्या जामीन अर्जास विरोध केला.

'शवविच्छेदन अहवालात वैष्णवीच्या शरीरावर तीस जखमा आढळून आल्या होत्या. तिचा सातत्याने क्रूर पद्धतीने छळ केला जात होता. तिने सासरी आत्महत्या केली आहे. समाज माध्यमातील संवाद आणि साक्षीदारांची साक्षीमुळे वैष्णवीचा छळ होत असल्याचे निदर्शनास आले होते. आरोपी नीलेशचे म्हणणे हगवणे कुटुंबीय ऐकत होते. त्याने वैष्णवीचा पती शशांक आणि नणंद करिश्माच्या मोबाइलमधील सीमकार्ड नष्ट केले. मोबाइल संवाद आणि आर्थिक व्यवहारातून करिश्मा आणि नीलेश एकमेकांच्या संपर्कात होते', असा युक्तिवाद विशेष सरकारी वकील पवार आणि ॲड. निंबाळकर यांनी केला.

न्यायाधीश के. पी. क्षीरसागर यांनी सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून वैष्णवीची सासू, नणंद आणि तिच्या मित्राचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

### जामीन फेटाळताना न्यायालयाचे निरीक्षण काय ?

» 'वैष्णवीला नऊ महिन्यांचा मुलगा आहे. कोणतीही आई बाळाशिवाय राहू शकत नाही. वैष्णवीने छळामुळे टोकाचा निर्णय घेतला. हा निर्णय घेण्यास तिला आरोपींनी भाग पाडले. हुंडाबळी हा समाजाला लागलेला मोठा कलंक आहे. या प्रकरणातील आरोपीना जामीन मंजूर केल्यास ते पुराव्यात छेडछाड करतील, तसेच साक्षीदारांवर दबाव आणतील,तसेच समाजहितही लक्षात घेणे गरजेचे आहे ' असे निरीक्षण न्यायाधीश के. पी. क्षीरसागर यांनी नोंदविले.